26 DEC 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमात मुलींचा झेंडा!

इम्रान गवंडी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात झालेल्या ६२ व्या दीक्षांत समारंभात मुलींनी पुन्हा एकदा आपली छाप पाडली आहे. विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये अव्वल क्रमांक पटकावण्यासह एकूण पदवी प्राप्त करण्यात मुलींनी मुलांना मागे टाकले आहे. एकूण पदवीधरांमध्ये २८ हजार ५१३ विद्यार्थिनींनी तर २१ हजार ३८९ विद्यार्थ्यांनी पदव्या प्राप्त केल्या आहेत. यामध्ये विद्यार्थिनींचा वाटा ५७.१३ टक्के तर मुलांचा वाटा ४२.८७ टक्के राहिला आहे. पदवी, पदवीव्युत्तर शिक्षणामध्ये विद्यार्थिनींनी अव्वल झेंडा रोवला आहे. असे असले तरी मुलींना नोकरी–व्यवसायात चालना मिळणे गरजचे आहे.

विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ मोठ्या थाटात झाला. यंदाच्या दीक्षांत समारंभात ४९ हजार ९०२ पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यामध्ये मुलींचे प्रमाण अधिक राहिले आहे. उच्च शिक्षणात मुलींनी मुलांपेक्षा सरस कामगिरी केली आहे. विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमात अव्वल क्रमांकात मुलींचे वर्चस्व राखले आहे. पदवीमध्ये (बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम. आदी) आणि पदव्युत्तर (एम.ए., एम.एस्सी., एम.कॉम. आदी) अभ्यासक्रमांमध्ये अव्वल राहण्याचा मान बहुतांशी मुलींनाच मिळाला. ही परंपरा अनेक वर्षांपासून अखंडित सुरू आहे.

गतवर्षीही मुलींचा वाटा ५० टक्क्यापेक्षा जास्त राहिला होता. अनेक वर्षांपासून अव्वल येणाऱ्यांमध्ये मुलींची संख्या नेहमीच जास्त असते. यंदाही 'हम भी कुछ कम नहीं' हे मुलींनी सिद्ध केले आहे. दीक्षांत समारंभात मुलींच्या वाढलेल्या टक्केवारीबद्दल विद्यापीठ प्रशासन, प्राध्यापक आणि कुलगुरूंनी समाधान व्यक्त केले आहे.



- दीक्षांत समारंभात २८,५१३ मुलींनी प्राप्त केले पदवी, पदव्युत्तर पदवी
- पदव्युत्तर शिक्षणामध्ये मुलींचा ५७.१३ टक्के वाटा
- उच्च शिक्षणातही मुलांना मुलींनी टाकले मागे

### उच्च शिक्षणात मुलींचा वाढता आलेख

**वर्ष १९६४ : १९९**

**वर्ष १९७४ : १ हजार ६२३**

**वर्ष १९८४ : ३ हजार २६८**

**वर्ष २०१८ : २६ हजार ९३८**

**वर्ष २०२३ : २१ हजार ९६३**

**वर्ष २०२४ : २८ हजार ५९२**

### पदवी प्राप्त झालेल्या स्नातकांची आकडेवारी

- **विद्यार्थिनींची संख्या :** ........................ २८ हजार ५१३ (५७.१३ टक्के)
- **विद्यार्थी संख्या :** ........................ २१ हजार ३८९ (४२.८७ टक्के)
- **एकूण पदवीप्राप्त संख्या :** ........................ ४९ हजार ९०२

### समाज व राष्ट्रासाठी योगदान

पदवीप्राप्त विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अध्ययन, नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार, नैतिक मूल्यांची जोपासना करत समाज व राष्ट्रासाठी योगदान द्यावे. विज्ञान, पर्यावरण, सामाजिक शास्त्रे आणि इतर क्षेत्रांत विपुल संधी उपलब्ध आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमात मुलींनी केलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. यापुढेही अशीच कामगिरी करून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर आपल्या क्षमतेचा ठसा उमटवावा, जागतिक समस्यांच्या निराकरणात योगदान द्यावे.

**– प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

**तरुण भारत अँकर**

**मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन**

ही कामगिरी ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणातील प्रगतीचे द्योतक आहे. विद्यापीठाचे प्रयत्न आणि शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीमुळे मुलींचा टक्का वाढत आहे. मुलींसाठी विशेष वसतिगृहे, शिष्यवृत्त्या, प्रोत्साहन योजना असल्यामुळे उच्च शिक्षणात मुलींचा सहभाग वाढला आहे.

**मुलींच्या उच्च शिक्षणाची दिशा मजबूत**

विद्यापीठाची ही परंपरा आकडेवारी पुरती मर्यादित नसून, महिला सक्षमीकरणाचे प्रतीक मानली जात आहे. यंदा हजारो विद्यार्थ्यांनी कुटुंबीयांसमवेत हा आनंद साजरा केला. मुलींच्या यशाने वातावरणात उत्साह संचारला. मुलींच्या या यशाने महाराष्ट्रातील उच्च शिक्षणातील दिशा अधिक मजबूत झाली आहे.

जनसंपर्क कक्ष
26 DEC 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणातून समाजसेवा हेच राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट

■ डॉ. टी. एम. चौगुले

प्रतिनिधी
कोल्हापूर

युवकांना समाजाशी जोडले जावे, समाजातील विविध समस्यांचे आकलन व्हावे,यासह 'शिक्षणातून समाजसेवा, समाजसेवेतून शिक्षण हेच राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट आहे. यामुळे युवक हा समाजाच्या विविध घटकाशी जोडला जातो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टीएम चौगुले यांनी केले.

न्यू कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनाच्यावतीने सांगरूळ येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील होते. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना डॉ. टी. एम. चौगुले. सोबत चेअरमन के. जी. पाटील, प्रा. डॉ. व्ही. एम. पाटील, वाय. एल. खाडे, डॉ. राजेश किरूळकर आदी.

डॉ. व्ही. एम. पाटील म्हणाले, या श्रमसंस्कार शिबिरामुळे विद्यार्थ्यांचा बहुमोल विकास घडून येण्यास मदत होते. तसेच समाजातील विविध घटकांच्या विकासासाठी फायदेशीर बनते. संचालक वाय. एल. खाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ज्युनिअर विभागाचे प्रकल्प अधिकारी डॉ. राजेश किरूळकर यांनी स्वागत केले. प्रकल्प अधिकारी डॉ. एस. एस. टिककेकर यांनी आभार मानले.

यावेळी सरपंच शीतल खाडे, उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले, प्रकल्प अधिकारी प्रा. अविनाश पाटील, डॉ. विजय पवार, प्रा. प्रशांत बोंडके, प्रा. प्रशांत कुचेकर, डॉ. रमजान पठाण, डॉ. संदीप जाधव, प्राध्यापिका मनीषा सुतार, प्रा. विद्या जाधव, सर्जेराव खाडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 DEC 2025
पुण्यनगरी

# श्रमसंस्कार शिबिरातून सामाजिक व्यक्तिमत्त्वाचा विकास

## डॉ. टी. एम. चौगुले यांचे प्रतिपादन

उचगाव : युवकांमध्ये समाजभान, श्रमप्रतिष्ठा आणि नेतृत्वगुणांचा विकास घडून येतो. राष्ट्रीय सेवा योजना ही देशातील सर्वात मोठी युवक संघटना असून, सामाजिक वसा आणि वारसा पुढे नेण्याचे कार्य करते. कृतीतून प्रशिक्षण, श्रमसंस्कारातून नैसर्गिक व्यक्तिमत्त्व विकास, तसेच सामाजिक चळवळीतील सहभागातून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडते, असे प्रतिपादन डॉ. टी. एम. चौगुले यांनी केले.

कंदलगाव (ता. करवीर) येथे महावीर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिर मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. गोपाळ गावडे होते. डॉ. चौगुले म्हणाले, समूहाने एकत्र काम करणे, समन्वय साधणे, प्रभावी संवाद आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होण्याचे कार्य अशा श्रमसंस्कार शिबिरातून साध्य होते. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. गोपाळ गावडे म्हणाले, शिबिरातून होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमातून शिबिरार्थींच्या कलागुणांना वाव दिला जातो. श्रमसंस्काराबरोबरच प्रबोधनपर व्याख्याने, तसेच स्वतःच्या कला व कौशल्यांना प्रदर्शित करण्याची संधी मिळते. डॉ. अंकुश बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सानिया मुल्लाणी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. सचिन बराटे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास डॉ. संदीप पाटील, डॉ. राजेश किरुळकर, डॉ. प्रदीप गायकवाड, डॉ. शशिकांत अन्नदाते, डॉ. संगीता महाजन, डॉ. सुषमा चौगुले, श्रीमती वर्षा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन स्वराली मुर्डेकर व साक्षी कांबळे यांनी केले. शिबिरास उपस्थित स्वयंसेवकांनी मार्गदर्शनाचा लाभ घेत सांस्कृतिक कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 DEC 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ इंटरझोनल स्पर्धेत न्यू कॉलेज विजेता

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथील शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज कॉलेजच्या मैदानावर आयोजित शिवाजी विद्यापीठ इंटरझोनल महिला फुटबॉल स्पर्धेत न्यू कॉलेज संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर शिवराज महाविद्यालयाच्या संघाने द्वितीय, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

विजयी संघांना प्रा. पोर्णिमा कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, मुख्याध्यापक ए. बी. पाटील यांच्या हस्ते चषक देऊन गौरवण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठ निवड समितीचे अध्यक्ष डॉ. शिवराज गायकवाड, सदस्य प्रा. एन. आर. कांबळे, प्रा. शिवाजी दाभाडे, निरीक्षक डॉ. श्रीनिवास पाटील, डॉ. रवी चव्हाण, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. धनंजय पाटील, डॉ. अमर सासने, प्रा. रामेश्वरी गुंजेकर, डॉ. विकास जाधव, प्रा. रोहन आडनाईक यांच्यासह क्रीडाशिक्षक, फुटबॉल संघाचे खेळाडू उपस्थित होते. अंतिम सामन्यात संपूर्ण सामन्यामध्ये शिवराज महाविद्यालयाच्या खेळाडूंनी जिद्दीने खेळत चेंडूवर ताबा मिळवून संपूर्ण सामन्यावर आपले वर्चस्व राखले; परंतु हा सामना गोल-शून्य बरोबरीत गेला व सामन्याचा निकाल सडनडेटवर न्यू. कॉलेजने निसटता विजय मिळविला.



**गडहिंग्लज : शिवराज कॉलेजमध्ये आयोजित महिला फुटबॉल स्पर्धेतील विजयी संघाला पारितोषिक देताना प्राचार्य एस. एम. कदम. उपस्थित मान्यवर.**

स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी क्रीडा विभाग प्रमुख डॉ. राहुल मगदूम, प्रा. जयवंत पाटील, किरण कावणेकर, आनंदा नाईक, जयंत माने, अमित पालकर आदींनी परिश्रम घेतले. कुपिंदर पवार, सागर पवार, सुरज कोंडूसकर, प्रशांत सलवादे, अभिजित पाटील यांनी पंच म्हणून काम पाहिले.